विशेष लेख

जयपूर अत्रौली घराण्याच्या ज्येष्ठ गायिका मोगूबाई कुर्डीकर यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या समकालीन गायकीचा वेध घेणारा लेख-

मंतरलेले स्वरदिवस

हिंदुस्थानी रागसंगीताचा अतिविशाल राजवाडा अनेक महाल व दालनांनी सजलेला आहे. हे महाल आणि ही दालने सदैव गजबजलेली राहिली आहेत. या वेगवेगळ्या कक्षांत चाललेले संगीत व्यवहार नित्यनूतन रंगतरंगांनी बहरत राहिले आहेत.

आपण नेहमी म्हणतो, की आमची संगीत परंपरा पाच हजार वर्षांची आहे. परंतु, खरी वस्तुस्थिती आहे ती ही, की आपल्या दृष्टिक्षेपात येणारा संगीताचा प्रत्यक्षातला इतिहास केवळ २५०-३०० वर्षांचाच आहे. त्यातही घराणेदार ख्याल, ठुमरी-दादरा हे तर अगदी १५० वर्षांपूर्वीचेच टप्पे आहेत आणि या ख्याल-ठुमरीतून जन्माला आलेले नाट्यसंगीत, भावगीत, गझल, चित्रपटसंगीत हे प्रकार तर आणखी पुढच्या काळातले.

या एकंदर पार्श्वभूमीवर महाराष्ट्राला अभिमानास्पद ठरणारी गोष्ट ही, की विसाव्या शतकाच्या

लखनौ या उत्तर भारतातील राजधान्याही संगीताला आश्रय देणाऱ्या होत्या.

भास्करबुवा बखले यांना तालीम देणारे उस्ताद फैज महम्मदखां हे बडोदा दरबारचे गवई होते. त्यांचे दुसरे गुरू नथ्थनखां (आग्रेवाले) हे आग्रा घराण्याचे उत्तुंग गायक. ते मुंबईस येऊन राहिले आणि पुढे म्हैसूर दरबारात राजगवई म्हणून रुजू झाले. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर मिरज संस्थानाचे राजगवई. उस्ताद फैयाजखां हे बडोदा संस्थानचे गवई, अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व काळात संगीत हे राजाश्रयाने जगत आणि वाढत होते. या राजाश्रयाच्या बरोबरीनेच समांतरपणे महाराष्ट्रात लोकाश्रयी आणि ज्ञानाश्रयी असे दोन ध्येयवादी प्रवाह रुजू झालेले होते, हेही या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.



बैठका श्रीमंतांच्या दिवाणखान्यात खासगी स्वरूपात, राजवाड्यावर, धनिकांच्या लग्नसमारंभ वगैरे प्रसंगी मर्यादित निमंत्रितांच्या उपस्थितांमध्ये होत असत. याला काही अपवादही होते. त्यातील एक महत्त्वाचे मैफली-केंद्र प्रो. बी. आर. देवधर यांच्या 'स्कूल ऑफ इंडियन म्युझिक'मधील

केसरबाई केरकर, नुकत्याच दिवंगत झालेल्या मोगूबाई कुर्डीकर, हिराबाई बडोदेकर, ताराबाई शिरोडकर, अंजनीबाई मालपेकर (कर्नाटकातल्या), गंगूबाई हनगल यांची नावे त्या काळात गाजत आणि वाजत होती. उस्ताद अल्लादियाखां, फैयाजखां, १९२२ पूर्वी भास्करबुवा, रहिमतखां (कुरुंदवाड), बाळकृष्णबुवा, वझेबुवा, अंतुबुवा जोशी, विनायकबुवा पटवर्धन, मा. कृष्णराव, मंजीखां (अल्लादियांचे चिरंजीव), विलायत हुसेनखां अशी १५-१६ नावे उच्च कोटीचे गायक म्हणून त्या काळी रसिकांच्या नजरेसमोर होती. या

वैशिष्ट्ये लिपिबद्ध केली आहेत, त्यातून त्या जमान्याची मूल्यवत्ता आपल्या लक्षात येऊ शकते.

याच कालक्रमात आकाशवाणी आणि ध्वनिमुद्रणाची भर पडली आणि संगीताचा प्रसार आणखी वेगाने आणि वेगळ्या घोडदौडीने होऊ लागला. परंतु, त्यासंबंधी खूप काही सांगण्यासारखे असले तरी आवरते घ्यावे लागेल, शिवाय सोलो-वाद्यवादनाचा अध्यायही तसा उशिराच सुरू झालेला आहे. कारण 'ॲम्प्लिफायर'शिवाय वाद्यवादनाला उठाव मिळणे अवघडच. निदान महाराष्ट्रात तरी वाद्यवादनाचा जमाना



पूर्वीपासून अखिल भारतीय संगीत क्षेत्राचे नेतृत्व करण्याचे श्रेय या आपल्या राज्यालाच द्यावे लागेल. परंतु, आजच्या वाजत-गाजत होणाऱ्या मैफलींच्या आणि प्रसिद्धीच्या झपाट्याच्या पार्श्वभूमीवर १९५० पूर्वीच्या कालखंडावर नजर टाकली तर अगदी वेगळं आणि खूपच तेजस्वी दृश्य आपल्याला पाहायला मिळेल. या दृष्टीने 'तो जमाना' कसा होता यावर एक धावता दृष्टिक्षेप टाकणे मनोरंजक आणि उद्बोधक ठरेल. वरील संदर्भात सर्वप्रथम नजरेत भरणारी गोष्ट ही की 'त्या' काळात मैफलींचा गजबजाट जवळजवळ नव्हताच. सर्वसामान्य जनता शास्त्रीय संगीताच्या मैफलींपासून दूरच होती. महाराष्ट्रापुरते पाहायचे तर मुंबई, पुणे, कोल्हापूर आणि गुजरातमधील बडोदा संस्थान ही संगीताची केंद्रस्थाने होती. तो उस्तादांचा जमाना होता. कोण कुणाचा गंडाबंद शागीर्द आहे, याला सर्वाधिक महत्त्व होतं. उस्तादसुद्धा त्या उंचीचे आणि योग्यतेचे होतेच. महाराष्ट्रात उस्ताद अल्लादियाखां आणि करीमखां यांचीच शिष्यशाखा गाजत होती. उस्तादांच्या बरोबरीनेच अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, मा. कृष्णराव ही पंडित मंडळीही गाजत होती. परंतु, त्यांची मूळ गंगोत्री उस्तादांचीच होती. या उस्तादी गानविद्येचे मूळ केंद्र ग्वाल्हेर-दरबार हे होते. ग्वाल्हेरच्या बरोबरीनेच आग्रा,


भास्करबुवा बखले


मोगूबाई कुर्डीकर


केसरबाई केरकर


अल्लादियाखां

लोकाश्रयी प्रवाहाचे नेतृत्व पं. विष्णु दिगंबर पलुस्कर करीत होते, तर ज्ञानाश्रयी शाखेची जबाबदारी पं. विष्णू नारायण भातखंडे यांनी ज्ञानवादी प्रेरणेतून अंगीकारलेली होती.

अशा प्रकारे स्वातंत्र्यपूर्व कालखंडात चार टप्प्यांमधून संगीताची विकासयात्रा प्रगतिपथावर अग्रेसर होत होती.

१) राजाश्रयाखालील उस्तादी व पंडिती गायन व्यवहार
२) ग्रंथप्रामाण्यातून शास्त्रनिर्मिती
३) संगीत विद्यालयांच्या निर्मितीतून सर्वसामान्य युवक-युवतींना संगीत विद्या शिकण्याची सोय आणि
४) मोठमोठ्या गायक-गायिकांच्या मैफलीतून संगीताचे आविष्करण.

परंतु त्या काळातील मैफली या अगदी खासगी स्वरूपाच्या असत. उपस्थिती ५० ते २०० च्या घरातली. ध्वनिक्षेपक (लाऊड स्पीकर) जवळ-जवळ अनुपस्थितीतच. गाण्याच्या

हॉल हे होते. पण तो काळ १९४५-४६ चा. दुसरा प्रयत्न त्या आधीचा आणि खूपच लक्षवेधी. पं. विष्णू दिगंबरांनी आपल्या विद्यालयीन शिष्यांच्या जाहीर मैफली करण्याचा उपक्रम राबविलेला होता. या कार्यक्रमात गायिल्या जाणाऱ्या चिजांचा कागद श्रोत्यांच्या हाती देणे, कार्यक्रम वेळेवर सुरू करणे, छोटेखानी भाषणातून जनतेचे संगीतविषयक प्रबोधन करणे असा आधुनिकतावादी दृष्टिकोन योजलेला असे. तिसरा प्रयत्न उस्ताद करीमखां साहेबांचा. जाहिरातीद्वारे तिकीट लावून कार्यक्रम करणारे पहिलेवहिले उस्ताद म्हणून त्यांच्या या उपक्रमाची नोंद करता येईल.

त्या कालखंडात विशेष गाजणारे गायक व गायिका यांची 'मांदियाळी'च उभी होती. हेही मोठे लक्षवेधी वैशिष्ट्य म्हणावे लागेल. मुंबई-पुणे-कोल्हापूर या शहरांत पंडिता

महनीय कलाकारांनीच संगीत कलेला खरोखरीची संजीवनी दिली. उस्ताद बडे गुलामअली हे १९४२ नंतर आले. पं. कुमार गंधर्व १९३४ पासून भारतभर गाजत होते. असा हा सर्व झगमगणारा कालखंड होता. या कालखंडाला पं. भातखंडे यांच्या शास्त्र मांडणीचीही महिरप प्राप्त झालेली होती. त्यांनी अनेक संगीत परिषदांमधून संगीत शास्त्र व व्यवहार यासंबंधीचे जागरण उच्च समाजात घडवून आणले होते. त्यांची ग्रंथनिर्मिती तर आजही आधारभूत ठरलेली आहे.

स्वातंत्र्यपूर्व (किंवा १९५० पूर्वीचा) कालखंड हा अस्सल गानसाधकांचा जमाना होता. तो ध्वनिक्षेपक नसलेला मैफली जमाना होता. गर्दीपेक्षा दर्दींचा तो कालखंड होता. गोविंदराव टेंबे, केशवराव भोळे यांजसारख्या आस्वादक संगीत समीक्षकांनी त्या काळाची जी

नंतरच आला. अर्थात गोविंदराव टेंबे यांच्या हार्मोनिअम वादनाचा अपवाद होताच. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मुख्यत्वे कंठ्यसंगीताचेच अधिराज्य होते.

शास्त्रीय संगीताच्या बरोबरीनेच लावणी, भावगीत आणि संगीत नाटकांमधील गायन व चित्रपटसंगीत यांचाही प्रसार १९५० पूर्वीच्या कालखंडात झालेला आहे. नाट्य संगीत, भावगीत आणि लावणी ही तर महाराष्ट्राची मिरासदारीच आहे. नाट्यसंगीतात केशवराव भोसले, बालगंधर्व व मा. दीनानाथ यांनी इतिहास घडविला आहे. लावणीमध्ये सुंदराबाई जाधव यांना कधी विसरता येणार नाही. १९३८ मधील भावगीताचे जनक गजाननराव वाटवे हे आजही जोमाने आपले संगीतकार्य करीत आहेत. त्यांच्यानंतर सुधीर फडके व इतर संगीतकार,गायक पुढे आले.

अशी ही १९५० पूर्वीच्या संगीताची श्रीमंतीनं नटलेली गुणगाथा! 'मंतरलेले दिवस' या शब्दांतच त्या कालखंडाचे वर्णन करावे लागेल. गर्दी, बिदागी, प्रसिद्धी यांच्या फूटपट्ट्या लावून त्या काळाचे मूल्यमापन करणे निरर्थक ठरेल. या काळातील मूलधनावरील व्याजावरच आजचे संगीत विकासमान होत आहे, हे विसरता येणार नाही.

डॉ. श्रीरंग संगोराम